# नगर पंचायत कार्यालय, मोताळा

जा.क्र./सा.बा.वि./न.प.मो./११५८/२०२०-२०२१
न.प.मोताळा / दिनांक :- ०२/०२/२०२०

नमुना क्रमांक २
(नियम ७)

**-:सुधारित प्रारंभ प्रमाणपत्र :-**

**( महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७) यांच्या कलम ४५ अन्वये याद्वारे )**

प्रति,

**श्री राजेश गुलाबचंद राठी**

आपले **आवक क्र. ११९२दि.२६/११/२०२०** चे अर्जावरून आपणांस **गट नं ३ A प्लॉट नंबर 8 मिळकत क्रमांक 5190** वर संभाव्य इमारती वर **तळ मजला व पहिला मजल्यावर दुकानाचे ( वाणिज्य प्रयोजनार्थ )** बांधकाम करण्याकरिता महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४५/६९ व महाराष्ट्र नगर पालिका कायदा १९६५ चे कलम १८९ व त्या खालील उपविधी व डेव्हलपमेंट कंट्रोल रुल्स अन्वये खालील शर्तीसह परवानगी देण्यात येत आहे.

१) भूखंडाचे चारही बाजूने मोकळ्या सोडावयाचे समासाचे अंतर खालील प्रमाणे सोडलेले असावे.

| | |
|---|---|
| समोरील बाजूने १ | ६-००/**४-५०**/३-०० मीटर |
| समोरील बाजूने २ | ६-००/**४-५०**/३-०० मीटर |
| मागील बाजूने | ४-५०/**३-००**/१-५० मीटर |
| राहिलेल्या बाजूने | **३-००**/२-२५/१-५० मीटर |

२) सोबतचे मंजूर नकाशाप्रमाणे बांधकाम करावे. बांधकामात कोणताही फेरबदल करू नये.

३) सदर परवानगी तुम्हांस तुमचे स्वतःचे मालकीचे भूखंडामध्ये बांधकाम करण्याकरिता बंधनकारक आहे. इतर कोणत्याही खाजगी दुसऱ्याचे मालकीचे भूखंडावर सरकारी तसेच तुमच्या स्वतःचे मालकीच्या नसलेल्या भूखंडावर बांधकाम करू नये.

४) आजू बाजूचे खाजगी अथवा सरकारी जमिनीवर अतिक्रमण करू नये.

५) संभाव्य इमारत बांधकामाचे साहित्य बिना परवानगी सरकारी जमिनीवर,रस्त्यावर,सर्व्हिस लाईन मध्ये ठेवू नये.

६) स्वतःचे भूखंडातील कोणतेही सांडपाणी, सेप्टिक संडासाचे पाणी, पावसाचे साचणारे पाणी हे स्वखर्चाने पक्क्या नालीद्वारे पाईपद्वारे, रस्त्या लगतच्या नजीकच्या नगर पालिकेच्या पक्क्या नालीपर्यंत आणून सोडलेले असावे.

७) सदर संभाव्य इमारतीचे प्राप्त परवानगीने बांधकामात जर नगर रचनाकार बुलडाणा ह्यांनी काही फेरबदल सुचविल्यास फेरबदलाप्रमाणे बांधकाम करणे तुम्हांस बंधनकारक राहील.

८) स्वतःचे मालकीचे भूखंडासमोर किमान पाच वृक्ष लावावीत.

९) सदर इमारत बांधकाम पूर्ण झाल्यावर तुमचे आर्कीटेक्ट/इंजिनिअर ह्यांचे मार्फत नकाशाच्या दोन प्रति दाखल कराव्यात. त्यातील एक प्रत कापडावर चिटकवलेली असावी.

१०) संभाव्य इमारतीचे बांधकाम हे प्लिंथचे (पायव) लेव्हलला आल्यानंतर बांधकामाचे तपासणी करिता नगर पालिके कडे रीतसर अर्ज देवून पुढील बांधकामाची परवानगी मिळाल्यावरच प्लिंथ चे (सुपर structure) वरचे बांधकाम करावे.

१०)इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यावर तिचा वापर (ऑक्यूपन्सी सर्टीफिकेट) वापर प्रमाणपत्र मिळाल्याशिवाय करू नये. त्यासाठी रीतसर अर्ज दाखल करावा. तो पावेतो इमारतीच्या अथवा इमारतीचे कोणतेही भागाचा निवासी उपयोगासाठी, व्यवसायासाठी, गोडाऊन म्हणून अथवा इतर कारणासाठी उपयोग करू नये व तशी परवानगी कोणासही देवू नये.

P.T.O

Scanned by CamScanner

११)सोबत जोडलेल्या नकाशात व साईट प्लान मध्ये दर्शविल्याप्रमाणे / लाल शाईने केलेले दुरुस्ती प्रमाणे संभाव्य इमारतीचे बांधकाम करण्यात यावे.

१२)इमारतीच्या छतावर पडणारे पावसाचे पाणी संकलित करून पुनःर्भरण करावे हे पाणी सोकपिट खोदून विंधन विहीर/विहीर ह्यामध्ये सोडण्यात यावे.

१३)प्रस्तावित बांधकाम हे भूकंप रोधक राहील याची दक्षता घेण्यात यावी.

१४)सौर उर्जेचा वापर करणे बंधनकारक राहील. पाणी टंचाई काळात काम बंद ठेवावे. काम सुरु असल्याचे आढळून आल्यास दिलेली परवानगी रद्द समजण्यात येईल.

१५)अर्ध्या भूखंडावर बांधकाम संमतीपत्राद्वारे करणार असून भविष्यात आपसाद्वाद निर्माण झाल्यास न.प. जबाबदार राहणार नसून वैयक्तिक संबंधीत मालक जबाबदार राहील. या अटीस अधीन राहून अर्ध्या भूखंडावर बांधकाम परवानगी देण्यात येत आहे.

१६)प्रस्तावित बांधकाम परवानगीसह कोणताही कायदेशीर प्रश्न निर्माण झाल्यास सदर प्रारंभ प्रमाणपत्र रद्द समजण्यात येईल. नाहरकत प्रमाणपत्राच्या जागेच्या मालकी संबंधी अस्तित्वात असलेल्या अगर चालू असलेल्या वादासंबंधी नगर पंचायत मोताळा जिल्हा बुलडाणा ह्यांचा कोणताही संबंध नाही.

१७) वाहन व्यवस्थे साठी लागणारी जागा सध्यस्थितीत व भविष्यात स्वखर्चाने उपलब्ध करून देवून उभारणे बंधनकारक राहील.

१८) आपण सदर जागेवर यापूर्वी ग्राउंड फ्लोअर करिता जा. क्र. सा.बा. वि./नपमो/८८२/२०२०-२१ दिनांक ०५/१०/२०२० रोजी या पूर्वी ९ दुकाने बांधकाम करण्यासाठी प्रारंभ प्रमाणपत्र व नकाशा जप्त करून सुधारित तळमजला व पहिला मजल्या वरील दुकानाचे बांधकाम मंजूर नकाशा प्रमाणे करणे बंधनकारक आहे.

१९)कोरोना-१९ रोगजन्य स्थिती मध्ये शासनाने वेळोवेळी सर्व अटी व शर्ती आधीन राहून सदर बांधकाम परवागनी देण्यात येत आहे. हे प्रारंभ प्रमाणपत्र (इमारत बांधकामाची परवानगी) तुम्हास मिळाल्याचे तारखेपासून फक्त पुढील एक वर्षाचे कालावधी करिता वैध राहील.

**प्रतिलिपी :-** १) मा. जिल्हाधिकारी, बुलडाणा यांना माहितीस्तव सविनय सादर.
२) मा. नगर रचनाकार, बुलडाणा यांना माहिती करिता रवाना.

नगर पंचायत कार्यालय मोताळा

मुख्याधिकारी
तथा नियोजन प्राधिकरण
नगर पंचायत, मोताळा.

**मुख्याधिकारी**
**तथा**
**नियोजन प्राधिकरण अधिकारी**
**नगर पंचायत, मोताळा**

Scanned by CamScanner